**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**पो. शिर्डी -४२३१०९,ता. राहाता जिल्हा अहिल्यानगर (महाराष्ट्र )**
**दुरध्वनी क्र. (०२४२३)२५८८४४/२५८८५५ फॅक्स – (०२४२३)१२५८७०**
Email : saiprasadalaya@sai.org.in / website : saibabasansthan.org.in or sai.org.in

---

## निविदा सुचना

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे खालील कामाकरीता बंद पाकिटात निविदा मागविणेत येत आहे.

| अ.नं. | **निविदेचा तपशील** |
|---|---|
| ०१ | श्री साई प्रसादालयामध्ये गिरणीतील निघणारा चाळण / कोंडा जनावरांना खाद्य म्हणुन विक्री करणे. |

१. निविदेचा कालावधी ऑगष्ट २०२५ ते जुलै २०२६ असा एक वर्षासाठी राहील.

२. निविदा/दरपत्रकधारकाने दरपत्रकावर आपले संपुर्ण नांव, पत्ता व दूरध्वनी/मोबाईल क्र. नमुद करावा. निविदेवर **"श्री साई प्रसादालय गिरणी चाळण/कोंडा निविदा "** असा उल्लेख करावा.

३. दरपत्रकधारकाने चाळण/कोंडयासाठी प्रती किलोचे दर दयावेत. दरपत्रकासंबंधी कोणतीही चर्चा/वाटाघाटी होणार नसल्याने अंतीम दर द्यावेत. एकदा दिलेल्या दरात कुठल्याही प्रकारचा बदल करण्यात येणार नाही. ज्याचा दर उच्चतम असेल त्यांनाच वर्षभरात जमा होणारा चाळण/कोंडा/कणी प्रती किलोच्या दराप्रमाणे देण्यात येईल.

४. दरपत्रकामध्ये आपला PAN नंबर नमुद करणे बंधनकारक राहील.

५. चाळण/कोंडा दर महिन्याचे १५ व ३० तारखेस विक्री करणेत येईल. चाळण/कोंडा घेऊन जाणेची सर्वस्वी जबाबदारी (वाहतूक करणेची) आपणावर राहील.

६. ज्या निविदाधारकांची निविदा मंजूर होईल, अशा निविदाधारकास चाळण/कोंडा उचलणेची हमी म्हणून रु.१०,०००/- (अक्षरी रुपये- दहा हजार मात्र) रक्कम संस्थानकडे सुरक्षा अनामत खाती जमा करावी लागेल. सदर रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. सदर रक्कम निविदा कालावधी संपल्यानंतर परत करणेत येईल .

७. निविदाधारकाने विहीत मुदतीत सदरील चाळण/कोंडा न नेल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता निविदा रद्द करणेत येऊन, संस्थान मध्ये जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल. त्याबाबत कोणतीही तक्रार करण्याचा अधिकार निविदाधारकास राहणार नाही.

८. निविदाधारकाने चाळण/कोंडयाची मोहोरबंद निविदा दि. १७ / ०७ /२०२५ पासुन ०५ दिवसाचे आत कार्यालयीन वेळेत संस्थानचे आवक विभागात जमा करावी.

९. चाळण/कोंडा निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे.

१०. चाळण/कोंडा विक्री संदर्भात काही वाद झाल्यास गांव-राहाता / कोपरगांव येथील न्यायकक्षेच्या अंतर्गत राहील.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी